रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### पतंग मुलांनी उडवल्यास भुर्दंड पालकांना;

## नायलॉन मांजा वापरल्यास २५ हजार, तर विकल्यास अडीच लाखांचा दंड

**जालना । प्रतिनिधी** - मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नायलॉन मांजाच्या वापरावर अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. सोमवारी, दिनांक १२ जानेवारी रोजी न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार, नायलॉन मांजाने पतंग उडवणाऱ्या व्यक्तीला, आणि अल्पवयीन मुलाच्या बाबतीत त्याच्या पालकांना, तब्बल २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येणार आहे. तसेच, या घातक मांजाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना अडीच लाख रुपयांचा जबर दंड आकारला जाईल.

नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश धन्नावत यांनी न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले की, न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत आवश्यक आणि दूरगामी परिणाम करणारा आहे. दरवर्षी नायलॉन मांजामुळे होणारे अपघात आणि निष्पाप जीव जाणवण्याच्या घटना अत्यंत दुःखद आहेत. केवळ विक्रेत्यांवरच नव्हे, तर वापरकर्त्यांवर आणि विशेषतः पालकांवर जबाबदारी निश्चित केल्याने या समस्येच्या मुळावर घाव घालण्यास मदत होईल. कायद्याचा धाक निर्माण झाल्याशिवाय बेजबाबदार वर्तनाला आळा बसणार नाही. दंडाची रक्कम जबर असल्याने निश्चितच प्रतिबंधात्मक परिणाम साधला जाईल.

न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, सातत्याने सूचना देऊन आणि जनजागृती करूनही नायलॉन मांजाचा सर्रास वापर सुरूच आहे, ज्यामुळे दरवर्षी अनेक नागरिकांना आणि पक्षांना जीव गमवावा लागतो किंवा गंभीर इजा होते. या परिस्थितीत कोणताही बदल होत नसल्याने, कठोर आणि जरब बसवणारी दंडात्मक कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत न्यायालयाने नोंदवले. यापूर्वी न्यायालयाने व्यक्ती आणि पालकांसाठी ५० हजार रुपये दंडाचा प्रस्ताव ठेवला होता, मात्र प्राप्त झालेल्या सूचना आणि हरकती विचारात घेऊन दंडाची रक्कम २५ हजार रुपये निश्चित करण्यात आली.

या निर्णयामुळे पालकांची जबाबदारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सध्याच्या काळात मुले अनेकदा पालकांचे ऐकत नाहीत आणि हट्ट करतात. अशा परिस्थितीत, मुलांनी हट्टाने किंवा नकळतपणे नायलॉन मांजा वापरून पतंग उडवल्यास, त्याचा थेट आर्थिक भुर्दंड पालकांना सोसावा लागणार आहे. आपल्या पाल्याच्या कृत्यामुळे होणाऱ्या गंभीर परिणामांची जाणीव करून देणे आणि त्यांना जबाबदार वर्तनाचे धडे देणे, हे पालकांचे कर्तव्य असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

दंडाच्या रकमेच्या वसुलीसाठी न्यायालयाने एक पारदर्शक यंत्रणा देखील स्थापन केली आहे. नागपूर महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी आणि उच्च न्यायालयाचे निबंधक (प्रशासन) यांच्या नियंत्रणाखाली 'लोककल्याण निधी' नावाचे एक स्वतंत्र खाते उघडण्याचे आदेश दिले आहेत. दंडाची रक्कम क्यूआर कोडद्वारे थेट या खात्यात जमा केली जाईल. दोषी व्यक्तीने किंवा पालकांनी जागेवर दंड न भरल्यास, त्यांना १५ दिवसांची मुदत दिली जाईल. या मुदतीतही रक्कम जमा न केल्यास, ती रक्कम जमीन महसुलाप्रमाणे वसूल करण्याची कारवाई केली जाईल.

न्यायालयाने दंडाच्या रकमेचा विनियोग कसा केला जाईल हे देखील स्पष्ट केले आहे. 'लोककल्याण निधी'मध्ये जमा होणारी रक्कम नायलॉन मांजामुळे जखमी होणाऱ्या व्यक्तींच्या उपचारासाठी वापरली जाईल. यातून पीडितांना तात्काळ वैद्यकीय मदत मिळण्यास हातभार लागणार आहे, जो एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्णय आहे.

इतकेच नव्हे, तर न्यायालयाने प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित केली आहे. जर एखाद्या परिसरात नायलॉन मांजामुळे कोणतीही अनुचित घटना घडल्यास, संबंधित अधिकार क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्याला जबाबदार धरले जाईल. कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई का करू नये, अशी कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश पोलीस आयुक्त किंवा अधीक्षकांना देण्यात आले आहेत.

या प्रकरणी न्यायालयाने स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेतली असून, यावर पुढील सुनावणी २० जानेवारी रोजी होणार आहे. न्यायालयाच्या या कठोर भूमिकेमुळे यावर्षीच्या मकरसंक्रांतीला नायलॉन मांजाच्या घातक विळख्यातून नागरिकांची आणि पक्षांची सुटका होईल, अशी आशा निर्माण झाली आहे.







जालना शहरात संचारबंदी काळामध्ये व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद ठेवून संचारबंदीचे पालन केले (छायाचित्र - अनिल व्यवहारे)

## हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

### सामाजिक ऐक्य, सेवा व प्रेरणेचा ऐतिहासिक सोहळा; प्रत्येकाने जास्तीत जास्त योगदान देण्याचे आवाहन

**नांदेड । प्रतिनिधी** - हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य-दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सामाजिक संस्था, संघटना व स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी सकारात्मकतेने पुढाकार घ्यावा व सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, कार्यकारी अधिकारी तथा समन्वयक डॉ. जगदीश सकवान,तहसीलदार संजय वारकड यांच्यासह विविध सामाजिक संस्था व संघटनांचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते.

मोदी मैदानावर कार्यक्रमस्थळी सुमारे ३५० स्टॉल उभारण्यात येणार असून प्रत्येक सामाजिक संघटनेने किमान ५ ते १० स्टॉल उभारून भाविकांना सेवा द्यावी, असे

आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी केले. हे स्टॉल दोन्ही दिवस सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहतील. प्रत्येक स्टॉलवर संबंधित संघटनेचे बॅनर लावण्यात येणार असून भाविकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाद, अल्पोपहार, माहिती व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच २४ जानेवारी रोजी तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा येथून निघणाऱ्या पालखी मिरवणुकीचे स्वागत करून मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले. या ठिकाणी भाविक मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार असल्याने सेवा व्यवस्थेसाठी स्वयंसेवकांनी अधिकाधिक योगदान द्यावे, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमासाठी दोन दिवसांत ८ ते १० लाख भाविक नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असून, त्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणांसह सामाजिक संघटनांनी सज्ज राहणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचा शाळा, महाविद्यालये व सामाजिक माध्यमांतून व्यापक प्रचार करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या बाहेर, पार्किंग स्थळी, स्टॉलसाठी आवश्यक साहित्य आणण्यासाठी वाहने व संबंधित व्यक्तींना प्रवेश पासेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

हा कार्यक्रम केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्य, सेवा आणि प्रेरणा देणारा ऐतिहासिक सोहळा असल्याने जास्तीत जास्त सामाजिक संघटनांनी पुढे येऊन सहभाग घ्यावा व हिंद-दी-चादर शहीदी समागम यशस्वी करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाच्या एकूण नियोजनाची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी उपस्थितांना दिली.

## परतूरात उद्यापासून श्री गणेशकुंज साईनाथ मंदिर वर्धापनोत्सव यात्रा

**परतूर । प्रतिनिधी** - श्री गणेश कुंज साईनाथ मंदिर च्या ६४ व्यक्ती वर्धापनोत्सव यात्रा १९ जानेवारी सोमवार पासून प्रारंभ होत आहे. सदरील यात्रा १ फेब्रुवारी पर्यंत राहणार आहे यात्रेत विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहे.



सोमवार दिनांक १९/०१/२०२६ रोजी भुमि पुजन कार्यक्रम व जागा वाटप, मंगळवार, बुधवार गुरुवार रोजी यात्रा कार्यक्रम, शुक्रवार २३/०१/२०२६ श्री गणेश जयंती जन्म उत्सव अभिषेक व श्री साईनाथ महापुजा व अभिषेक, शनिवार २४/०१/२०२६ यात्रा कार्यक्रम, रविवार रोजी २५/०१/२०२६ श्री भागवत प्रारंभ व श्री गुरु चरित्र पारायण, सोमवार २६/०१/२०२६ रोजी श्री साई चरित्र पारायण, शुक्रवार २९/०१/२०२६ रोजी संत गयाबाई म. बाबुलतारा यांच खंजेरी भजन, शनिवार ३०/०१/२०२६ यात्रा कार्यक्रम ३१/०१/२०२६ रोजी श्री भागवत समाप्ती रविवार ०१/०२/२०२६, श्री साई चरित्र समाप्ती, श्री सत्यनारायण पुजा व यात्रेच्या समारोप दिवशी (पोर्णिमा) व महाप्रसाद (भंडारा) होणार आहे,

सदरील यात्रेच्या नियोजन नुसार कार्यक्रम राहील. दान हे दान पेटीत टाकावे. यात्रेत येणाऱ्या लहान, मोठ्या व्यापाऱ्यांनी साईनाथ मंदीरात येवुन आपल्या जागेची पावती घेऊन आपल्या जागेवर दुकान लावावे. मंदीराच्या आवारात कोणीही दूकान लावु नये. कृपा आसावी. मंदिराच्या बाजुला वाहानांची पार्कींगची व्यवस्था केली आहे. यात्रा परिसरात वाहान चालवू नाही. व यात्रा परिसारात वाहन ठेवल्यास ५०० दंड लागेल. पोलीस स्टेशन परतूर यांच्या आदेशाने, यात्रेत येण्याऱ्या भावीकांनी स्वच्छता, शांतता व दक्षता ठेवावे असे आवाहन व्यवस्थापक विश्वस्त पुजारी परतूर रामकृष्ण सायन्ना वंगुर, लक्ष्मण वंगूर, बाबुराजा वंगूर, आनंद वंगूर, कार्तिक वंगूर यांनी केले आहे.

यात्रा यशस्वी करण्यासाठी साई भक्त मंडळ सेवक व भाविक परिश्रम घेत आहेत.





माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या जालना शहर महानगरपालिकेच्या नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल श्री विठ्ठल-रुख्मिणी मूर्ती देऊन सत्कार केला. या प्रसंगी आमदार लोणीकर यांनी श्री. दानवे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शहराच्या विकासासाठी तसेच नागरिकांच्या हितासाठी श्री. दानवे यांच्या माध्यमातून सकारात्मक कार्य घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हे पहिल्या छायाचित्रता तर दुसऱ्या छायाचित्रात विप्र फाउंडेशन जालना तर्फे नवनिर्वाचित नगरसेवक मा. श्री. भास्कर आबा दानवे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.








निवडणुक निकालानंतर विजयाचे प्रमाणपत्र घेतांना पहिल्या छायाचित्रात प्रभाग १५ मधून संजय डुकरे पाटील. दुसऱ्या छायाचित्रात प्रभाग १५ मधून विजयी उमेदवार श्रीमती वंदना अरुण मगरे. तिसऱ्या छायाचित्रात प्रभाग चौदा मधून विजयी उमेदवार ॲड. रीमा संदीप खरात (काळे), चौथ्या छायाचित्रात तेरा मधून विजयी महेश निकम, पाचव्या छायाचित्रात प्रभाग सोळा मधून निखील पगारे. सहाव्या छायाचित्रात विजयाचा जल्लोष करतांना विजयी उमेदवार संजय डुकरे पाटील व मित्र मंडळ.

प्रभाग क्र -16- नांव भाग्योदयनगर, यशवंतनगर, आनंदनगर, राजपुतवाडी
जागा क्र. 16-अ आरक्षण-अनुसूचित जाती

मतदानाचा दिनांक 15/01/2026

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली वैद्य मते | पक्ष /आघाडी/ फ्रट/ अपक्ष |
|---|---|---|---|
| 1 | अतुल नारायणराव इंगळे | 901 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| 2 | अर्जुन किशोर धाकतोडे | 338 | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 3 | निखील रमेश पगारे | 3219 | शिवसेना |
| 4 | विनोद विठ्ठलराव रत्नपारखे | 2559 | भारतीय जनता पार्टी |
| 5 | गिरधारी मोहन लोंढे | 89 | बहुजन मुक्ती पार्टी |
| 6 | अमोल विष्णू लोखंडे | 327 | वंचीत बहुजन आघाडी |
| 7 | गायकवाड कल्पना विठ्ठलराव | 23 | अपक्ष |
| 8 | बोर्डे भास्कर शेषराव | 44 | अपक्ष |
| 9 | लांडगे रतन आसाराम | 15 | अपक्ष |
| 10 | NOTA | 139 | |
| | | एकूण वैद्य मते | 7654 |
| | | एकूण अवैध मते | 4 |
| | | एकूण प्रदत्त मते | 0 |

प्रभाग क्र -16- नांव भाग्योदयनगर, यशवंतनगर, आनंदनगर, राजपुतवाडी
जागा क्र. 16- ब आरक्षण-नागरीकांचा मागास प्रवर्ग (महिला)

मतदानाचा दिनांक 15/01/2026

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली वैद्य मते | पक्ष /आघाडी/ फ्रट/ अपक्ष |
|---|---|---|---|
| 1 | सुनंदा लिंबाजी ढाकणे | 836 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| 2 | कल्याणी बाबु पवार | 2418 | भारतीय जनता पार्टी |
| 3 | उषाबाई अशोक पांगारकर | 3130 | शिवसेना |
| 4 | सुवर्णा सतिष मुंढे | 593 | वंचित बहुजन आघाडी |
| 5 | कामिनी निलेश देशमाने | 460 | अपक्ष |
| 6 | NOTA | 217 | |
| | | एकूण वैध मते | 7654 |
| | | एकूण अवैध मते | 4 |
| | | एकूण प्रदत्त मते | 0 |

प्रभाग क्र -16- नांव भाग्योदयनगर, यशवंतनगर, आनंदनगर, राजपुतवाडी
जागा क्र. 16- क आरक्षण-सर्वसाधारण (महिला)

मतदानाचा दिनांक 15/01/2026

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली वैद्य मते | पक्ष /आघाडी/ फ्रट/ अपक्ष |
|---|---|---|---|
| 1 | दर्शना विजय झोल | 4451 | शिवसेना |
| 2 | टेकाळे सुचिता सचिन | 1545 | भारतीय जनता पार्टी |
| 3 | बनकर श्रध्दा महेंद्र | 293 | बहुजन समाज पार्टी |
| 4 | बागल चंद्रकला एकनाथ | 516 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| 5 | सौ.शितल भ्र कैलास बारोटे | 207 | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 6 | होर्शिळ रमाबाई अरविंद | 403 | वंचित बहुजन आघाडी |
| 7 | मंदा शंकर पवार | 61 | अपक्ष |
| 8 | अनिता माधवराव सरवडीकर | 47 | अपक्ष |
| 9 | NOTA | 131 | |
| | | एकूण वैध मते | 7654 |
| | | एकूण अवैध मते | 4 |
| | | एकूण प्रदत्त मते | 0 |

प्रभाग क्र -16- नांव भाग्योदयनगर, यशवंतनगर, आनंदनगर, राजपुतवाडी
जागा क्र. 16- ड आरक्षण-सर्वसाधारण

मतदानाचा दिनांक 15/01/2026

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली वैद्य मते | पक्ष /आघाडी/ फ्रट/ अपक्ष |
|---|---|---|---|
| 1 | अमोल प्रदिपसिंह ठाकुर | 3514 | शिवसेना |
| 2 | निलेश कल्याण दळे | 547 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| 3 | आदित्य नारायण बोराडे | 1932 | भारतीय जनता पार्टी |
| 4 | सुनिल सुधाकर रत्नपारखे | 606 | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 5 | विशाल लक्ष्मण हिवाळे | 25 | आम आदमी पार्टी |
| 6 | भालेराव दिपक शामराव | 729 | वंचित बहुजन आघाडी |
| 7 | संदीप सुभाष हिवाळे | 49 | बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी |
| 8 | नावकर अशोक गंगाराम | 75 | अपक्ष |
| 9 | साळवे अमित सुनिल | 30 | अपक्ष |
| 10 | NOTA | 147 | |
| | | एकूण वैध मते | 7654 |
| | | एकूण अवैध मते | 4 |
| | | एकूण प्रदत्त मते | 0 |

# पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रयोगातून शिकलेले विज्ञान कायमस्वरूपी लक्षात राहते-सुनील रायठठ्ठा

## रोटरीतर्फे अन्वी येथील आश्रमशाळेला शंभर प्रयोगांची सुसज्ज प्रयोगशाळा



**जालना । प्रतिनिधी -** बदनापूर तालुक्यातील अन्वी येथील निवासी संत भगवान बाबा आश्रम आश्रमशाळेसाठी रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे ज्येष्ठ रोटरी सदस्य तथा विनोदराय इंजिनिअरिंगचे संचालक सुनील रायठठ्ठा यांच्या सहकार्याने नाविन्यपूर्ण १०० मॉडेल्सची सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात आली.

पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्री. गावंडे म्हणाले की म्हणाले की, महाराष्ट्रातील कोणत्याही आश्रमशाळेत नसेल, अशी ही अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाची दारे उघडी करणारी ठरणार आहे. सुनील रायठठ्ठा यांच्याकडे आम्ही प्रयोगशाळेबाबत विनंती केली असता, त्यांनी रोटरीच्या माध्यमातून तात्काळ प्रयोगशाळा उपलब्ध करून दिली असून, ही आमच्यासाठी सर्वात मोठी भेट आहे.

प्रयोगशाळेचा उद्देश विशद करताना सुनील रायठठ्ठा म्हणाले की, दुर्गम भागातील मुलांना विज्ञानातील विविध प्रयोग स्वतःच्या हाताने करून पाहता यावेत, हा आमचा मुख्य उद्देश आहे. केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रयोगातून शिकलेले विज्ञान मुलांच्या कायमस्वरूपी लक्षात राहते. या अत्याधुनिक १०० मॉडेल्सच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुलांच्या बुद्धिमत्तेला चालना मिळेल आणि त्यांना रोज नवनवीन गोष्टी शिकायला मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रोटरी क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्षा वर्षा पित्ती म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी जिद्द असते. मात्र, साधनांच्या अभावी ते मागे पडतात. रोटरीच्या माध्यमातून आमचा हाच प्रयत्न आहे की, अशा गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना आधुनिक सोयी पुरवाव्यात. या प्रयोगशाळेमुळे शाळेतील मुलांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण होईल आणि यातूनच भविष्यातील थोर शास्त्रज्ञ घडतील, अशी आम्हाला खात्री आहे.

यावेळी मुख्याध्यापक अरविंद पवार यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाभार्थ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने दिरंगाई करू नये - आ. उढाण

**घनसावंगी । प्रतिनिधी** - शेतकरी व सर्वसामान्य लाभार्थ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने दिरंगाई करू नये, अशी ठाम भूमिका घेत आमदार हिकमतदादा उढाण यांनी पुढील आठ दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे स्पष्ट आदेश दिले.

शिवसेना जनसंपर्क कार्यालय, घनसावंगी येथे आज अनुदान व घरकुल योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अंबड तालुका व घनसावंगी तालुक्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



बैठकीदरम्यान आमदार हिकमतदादा उढाण यांनी सांगितले की, शेतकऱ्यांचे अनुदान रखडल्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कोणतीही सबब न देता येणाऱ्या आठ दिवसांत अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. तसेच घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून घरकुलाचे प्रलंबित हप्ते जमा करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

योजनांचा लाभ वेळेत मिळणे हा लाभार्थ्यांचा हक्क आहे. प्रशासनाने जबाबदारीने काम केले पाहिजे. लाभार्थ्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही आमदार हिकमतदादा उढाण यांनी यावेळी दिला. या बैठकीस तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच अनुदान व घरकुल योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जालना महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग १३ मधून विजयी उमेदवार सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस जल्लोष करतांना.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघातर्फे दर्पण दिन साजरा

**जालना । प्रतिनिधी -** मराठी वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघातर्फे दर्पण दिन १० जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार बाबुराव व्यवहारे तर प्रमुख पाहूणे म्हणून सामाजिक कार्यकर्ता तुलजेस भैय्या चौधरी हे होते. तर व्यासपीठावर जेष्ठ पत्रकार विनायक दहातोंडे, विलास खानापुरे, मंठ्याचे बाबुजी तिवारी, संपादक अर्पण गोयल, पारसनंद यादव , अहेमद नुर, श्रीकिशन झंवर, लियाकत अली खान, परतुरचे एल.एम. कुरेशी, साईनाथ चिन्नादोरे, ॲड. महेश धन्नावत, जेष्ठ डिटीपी ऑपरेटर मधुकर मुळे, जेष्ठ मशिन चालक शेख शफीभाई आदि होते.यावेळी तुलजेसभैय्या चौधरी यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी मोलाचं कार्य केलं असं ते म्हणाले. आपल्या लेखणीतून वास्तव घटनांचं अचूक चित्रण करणं आणि समाजातल्या अनैतिक, अन्यायी प्रवृत्तीवर प्रहार करणार्या पत्रकारितेचा वारसा आपल्या देशाला लाभला आहे असे ते म्हणाले. यावेळी पत्रकार बद्री उपरे, मनिष तिवारी, अजयअण्णा देशपांडे आदींची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.